# भारत अमेरिका संबंध – सद्य आयाम

बीए भाग ३

# भारत अमेरिका सहकार्याचे तीन सद्य आयाम

- द्विपक्षीय सहकार्य
- प्रदेशनिष्ठ सहकार्य
- बहुपक्षीय सहकार्य

# द्विपक्षीय सहकार्य- अर्थ आणि व्यापार

- द्विपक्षीय व्यापार- ११९ बिलियन डॉलर (1,08,78,07,50,00,000रुपये)
- भारतात अमेरिकेची गुंतवणूक -४६ बिलियन डॉलर (२०२१)
- भारतात २००० पेक्षा अधिक अमेरिकन कंपन्या
- भारताच्या २०० हून अधिक कंपन्यानी अमेरिकेत १,२५,००० हून अधिक नोकऱ्या तयार केल्या आहेत.
- उद्दिष्ट: द्विपक्षीय व्यापार ५०० बिलियन डॉलर पर्यंत नेणे.
- कोव्हीडचा अर्थव्यवस्थेवरील परिणाम हे येत्या काळात मोठे आव्हान
- संरक्षणवादी आर्थिक धोरण टिकण्याची अपेक्षा – पणH1-B विसा नियम शिथिल होण्याची शक्यता.
- युएसए भारताचा सर्वात मोठा व्यापारी मित्र – भारताचा trade surplus

# भारत-अमेरिका सुरक्षाविषयक संबंध

- **मेजर डिफेन्स पार्टनर – २०१६ पासून**
- Strategic Trade Authorization tier 1 status, २०१८ पासून (व्यापक मिलिटरी आणि दुहेरी-वापर यु.एस. तंत्रज्ञानाचा भारताला परवानामुक्त वापर शक्य)
- Logistics Exchange Memorandum of Agreement (LEMOA) (परस्पराच्या सैन्यविषयक सुविधांची उपलब्धी)
- Communications, Compatibility and Security Agreement (COMCASA) (सुरक्षाविषयक माहितीचे संकेतबद्ध वहन)
- Industrial Security Agreement (ISA) (सुरक्षा उत्पादनविषयक माहितीची यु एस आणि भारतीय कंपन्यांमध्ये देवाणघेवाण ) -India-U.S. General Security of Military Information Agreement **(GSOMIA)**
- सुरक्षासाहित्यातील व्यापार २० बिलियन डॉलर
- ‘टायगर ट्रायम्फ’, तिन्ही सेनांचे (भूमी, पाणी, हवा) एकत्र संचलन -२०१९
- U.S.-led Rim of the Pacific (RIMPAC) exercise and trilateral Malabar exercise with the United States and Japan अमेरिका व जपान यांच्यासोबत पॅसिफिक समुद्राच्या कडेवर संचलन
- The PM Bureau - अमेरीकेचे भारतासोबत शांतीसेनांच्या संदर्भात सहकार्य

# भारत-अमेरिका ऊर्जा व तंत्रज्ञान सहकार्य

- Partnership to Advance Clean Energy (PACE) signed in 2009 (स्वच्छ ऊर्जा निर्मितीसाठी भागीदारी) - स्वच्छ ऊर्जा तंत्रज्ञानाचे एकत्र संशोधन आणि वापर, कमी कार्बनयुक्त उत्पादन. – यांतील अनेक नवीन उपक्रम २०१५ आणि २०१६ मध्ये हाती घेतले गेले आहेत.
- भारताचे अपारंपरिक उर्जेच्या उत्पादनाचे ध्येय: २०२२ पर्यंत १७५ गिगावॅट, सौरउर्जा निर्मितीचे ध्येय: २०२२ पर्यंत १०० गिगावॅट
- यु एस भारत ऊर्जा संवाद – वार्षिक
- बिडेन आणि मोदी यांनी ‐हवामान बदल रोखणे’ हा आपल्या भागीदारीचा एक प्रमुख आयाम मानला आहे. भारताला याबाबतीत यु एस कडून तंत्रज्ञान आणि निधीची गरज आहे. ($2.5 trillion in finance by 2030) यात भारत-यु एस भागीदारीचा हेतू, सद्य अनिश्चित परिस्थितीत आणि गुंतवणुकदारांच्या निरुत्साहात,भारतात हरित सोयीसुविधा तयार करण्यासाठी खाजगी गुंतवणुकीचे प्रवाह वाढविणे हा आहे.

# इंडो-पॅसिफिक प्रदेश आणि भारत-अमेरिका



# इंडो-पॅसिफिक प्रदेश आणि भारत-अमेरिका

- एक कल्पित भू-राजकीय प्रदेश
- हिंदी महासागर आणि पॅसिफिक महासागर यांना सामावणारा प्रदेश
- व्याप्ती आफ्रिकेच्या पूर्व किनाऱ्यापासून अमेरिकेच्या पश्चिम किनाऱ्यापर्यंत. इंडो पॅसिफिक ची व्याख्या कोण करत आहे यावरून या प्रदेशाचा आकार व व्याप्ती बदलते

**या प्रदेशाचे महत्त्व**

- औद्योगिकरणामुळे या प्रदेशाला महत्त्वाची उत्पादन केंद्रे, बाजारपेठा (लोकसंख्या) मोठ्या प्रमाणात ऊर्जा ग्रहण करणारा प्रदेश म्हणून महत्त्व प्राप्त झाले.
- जागतिकीकरणामुळे जुन्या सीमारेषांचे महत्व कमकुवत झाले आहे आणि राष्ट्रांमधील संबंधांच्या नवीन रचना तयार होत आहेत
- जगातील सर्वात महत्त्वाचे सागरी मार्ग या प्रदेशातून जातात.
- प्रदेशातील चीनचा वाढता प्रभाव हे इंडो-पॅसिफिकच्या वाढत्या महत्त्वाचे धोरणात्मक कारण आहे. उर्जा आणि व्यापार या आपल्या गरजांच्या पूर्ततेसाठी या भागावर चीनने आपले धोरणात्मक जाळे टाकले आहेत –
- दक्षिण चीनी सागरात उलाढाली
- हिंदी महासागर बंदरांची मालिका
- इंडो पॅसिफिक मधील सर्व देशांसाठी चीन हा सर्वात मोठा व्यापारी भागीदार आहे
- अमेरिकन नाविक सत्तेचे महत्त्वाचे क्षेत्र
- शेतयुद्धानंतरच्या काळात इथल्या मित्र राष्ट्रांवर संपूर्ण नियंत्रण ठेवण्यात अमेरिकेला अपयश आले

# चीनचा बेल्ट अँड रोड उपक्रम आणि भारत-अमेरिका




- ७०  हून अधिक देश आणि आंतरराष्ट्रीय संस्थांमध्ये चीनची गुंतवणूक.
- सुरुवात २०१३; २०४९  मध्ये पूर्णत्वास जाण्याची अपेक्षा.
- पूर्व आणि पश्चिमेला जोडणाऱ्या आणि मध्य आशियातून जाणाऱ्या पूर्वीच्या ‘सिल्क रोड’ च्या प्रेरणेतून  ‘बेल्ट’ हा  चीन पासून पश्चिम आशिया पर्यंत मध्य आशियातून जाणारा जमिनीवरील व्यापारी मार्ग; आणि, दक्षिण पूर्व आशिया, दक्षिण आशिया, पश्चिम आशिया आणि पूर्व आफ्रिकेला जोडणारा आंतरराष्ट्रीय बंदरांच्या मालिकांनी बनलेला सागरी मार्ग.
- आंतरराष्ट्रीय व्यापाराचे चीनकेंद्री जाळे विणण्याचा प्रयत्न.
- युनायटेड स्टेट्सच्या  आंतरराष्ट्रीय व्यापारावरील वर्चस्वाला आणि जागतिक राजकारणातील वर्चस्वाला आव्हान देण्याचे एक धोरण

# इंडो-पॅसिफिक आणि भारत-अमेरिका सहकार्य

- भारतासाठी इंडो-पॅसिफिक हा आपल्या ‘पूर्वेकडे पहा’ या  धोरणाचा  भाग म्हणून महत्त्वाचे आहे.
- स्वतःच्या संरक्षणाच्या दृष्टीने चीनचा एकूण  जागतिक प्रभाव  रोखण्याचे उद्‌दिष्ट भारताला इंडो-पॅसिफिक च्या बाबतीत अमेरिकेच्या जवळ घेऊन जाते.
- “मुक्त आणि खुले इंडो-पॅसिफिक” - सागरी मार्ग मुक्त आणि सगळ्यांना उपलब्ध असणे. हे ‘क्वाड’चे या प्रदेशातील उद्‌दिष्ट आहे.
- भारताचे पारंपरिक पूर्व आशिया धोरण  चीनला वगळून पूर्ण  होत नाही.  चीन भारताच्या पूर्व आशिया व्यापार व संपर्क जाळ्याचा एक भाग आहे.  ‘सर्वांचा विकास  आणि सर्वांना सहभाग’ ही भारताची भूमिका इंडो-पॅसिफिक च्या बाबतीत राहिलेली आहे.  “संपूर्ण प्रदेशाची सुरक्षिततता आणि वाढ” (Security and Growth of All Region - SAGAR) - हा भारताचा दृष्टीकोन आहे.
- अमेरिकेसोबतचे क्वाड  धोरण या उद्‌दिष्टाला छेद देते. अजूनपर्यंत भारत याबाबत अनिर्णित आहे .

# बहुपक्षीय आंतरराष्ट्रीय सहकार्य

- यु एन, जी-२०, आसियान प्रादेशिक गट, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक, जागतिक व्यापर संघटना
- यु एन सुरक्षा परिषदेचे सदस्यत्व
- आर्थिक सहकार्य आणि विकास परिषदेचे भागीदार
- **Coalition for Disaster Resilient Infrastructure** (CDRI) भारताने सुरू केलेला उपक्रम, २०१९
- Organization for Economic Cooperation and Development partners: Forum and knowledge hub for data and analysis, exchange of experiences, best-practice sharing, and advice on public policies and international standard-setting.